भौतिकोपचार महाविद्यालयाला मान्यता देण्याबाबत.

भारती विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पुणे संचलित स्कुल ऑफ फिजीओथेरपी, पुणे.

## महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय, क्रमांक: पीएसओ-२०२०/प्र.क्र.२३४/२०/शिक्षण-१

९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.

दिनांक : २० डिसेंबर, २०२१.

वाचा : १) शासन निर्णय, क्र.एमईडी-२०१७/प्र.क्र.२१०/१७/शिक्षण-१, दि.२६.१०.२०१७.

२) प्रबंधक, भारती विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पुणे यांचे पत्र क्र. बीव्हीडीयु/-ए१४/२०२०-२१/१६९२, दि.२८.१०.२०२०.

३) शासन निर्णय क्र.एमईडी-२०२०/प्र.क्र.१४६/२०/शिक्षण-१, दि.१६.१२.२०२०.

४) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र. मआविवि/ पीबी/युजी/पी-६/५३८/२०२१, दि.०८.०४.२०२१.

५) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र.संवैशिवसं/ नवीन/ बीपी टीएच/युजी/भाअपुणे/पीटीपुणे/युजी-०३/२०२१/२४७९/१-अ, दि.१९.०७.२०२१.

**प्रस्तावना:**

भारती विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), भारती विद्यापीठ भवन, लाल बहादूर शास्त्री मार्ग, पुणे संचलित स्कुल ऑफ फिजीओथेरपी, पुणे या संस्थेचा भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.(२) येथील पत्रान्वये शासनास प्राप्त झाला होता. संदर्भ क्र.(३) येथील शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदर प्रस्ताव कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याकडे छाननी करीता पाठविण्यात आला होता. संदर्भ क्र.(४) येथील पत्रान्वये कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सदर प्रस्ताव छाननी करुन शासनास पाठविला होता. त्यानुसार संदर्भ क्र.(१) येथील शासन निर्णयात विहित केल्याप्रमाणे छाननी शुल्क भरणा करुन घेऊन सदर संस्थेची संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचेमार्फत सक्षमता तपासणी करण्यात आली. संचालक, वैद्यकीय शिक्षण यांनी सक्षमता तपासणीचा अहवाल संदर्भ क्र.(५) येथील पत्रान्वये शासनास सादर केला असून त्यांनी उक्त संस्थेच्या भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमाला परवानगी देण्याबाबत शिफारस केली आहे. सदर शिफारस विचारात घेऊन उक्त महाविद्यालयातील भौतिकोपचार अभ्यासक्रमाला शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन, भारती विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), भारती विद्यापीठ भवन, लाल बहादूर शास्त्री मार्ग, पुणे

Scanned by CamScanner

संचलित स्कुल ऑफ फिजीओथेरपी, पुणे हे भौतिकोपचार पदवी अभ्यासक्रमाचे महाविद्यालय शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे:-

१) या महाविद्यालयातील भौतिकोपचार पदवी या अभ्यासक्रमाच्या ६० (साठ) इतक्या प्रवेश क्षमतेस मंजूरी देण्यात येत आहे.

२) सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता राज्य शासन/ केंद्रशासन/ मा.सर्वोच्च न्यायालय अथवा मा.उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती अवलंबण्यात यावी.

३) राज्य शासनाने भौतिकोपचार अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

४) महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट क्र.VI १९८८) मधील तरतूदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

५) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/ अनावर्ती वा अन्य स्वरुपाच्या कोणत्याही खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने दिले पाहिजे.

६) शासकीय वैद्यकीय किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत सदरहू संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

७) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिलेल्या शिफारशींच्या आधारे सदर परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर आदेश राज्य शासनास प्राप्त अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. श्रीनिवास पुं. कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई.
७. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई .
८. कुलसचिव, भारती विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), भारती विद्यापीठ भवन, लाल बहादूर शास्त्री मार्ग, पुणे -४११०३०.
९. अवर सचिव (शिक्षण-२), वै.शि. व औ.द्र. विभाग, मंत्रालय, मुंबई.

Scanned by CamScanner